I.O

(4)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** भोकर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0022 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/01/2022 18:44 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 05/01/2022
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/01/2022
**Time From (वेळेपासून):** 13:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/01/2022 **Time (वेळ):** 18:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 040 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/01/2022 18:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** साईसागर हॉटेल ,आँबेडकर चौक ,भोकर जि नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** करवंदे राहुल गौतम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamSca

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मुडी ता वसमत ,वसमत जि हिंगोली ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मुडी ता वसमत ,वसमत जि हिंगोली ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रघुनाथ दिगंबर वानखेडे | | | 1. पोलीस स्टेशन भोकर,भोकर ,भोकर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादिशासकीय विश्रामगृह भोकर जि. नांदेड दिंनाक 17/01/2022माझे नांव करवंदे राहूल गौतम वय 31 वर्षे व्यवसाय बिल्डींग मटेरीअल सप्लायर्स रा. मुडी ता. वसमत जि. हिंगोली मो.क्र 9765329198मी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिं. 05/01/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथील पोलीस निरीक्षक श्री. संतोष इंगळे यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, माझे कडे दोन टिप्पर वाहन असुन त्याचा क्रमांक MH 31 CB 8857 व MH 40 Y 2435 असा आहे. या वाहना द्वारे मी भोकर शहरात बिल्डींग मटेरीअलची वाहतुक करतो. दिंनाक 15/12/2021 रोजी मला पोलीस स्टेशन भोकर येथील श्री. वानखेडे पोलीस कर्मचारी हे तामसा रोड, भोकर येथे भेटले व मला म्हटले की, तुझ्या दोन गाडया भोकर शहरात बिल्डींग मटेरीअल वर चालत असुन त्या चालवायच्या असेल तर प्रत्येक महिन्याला दोन्ही गाडयाचे 18,000/- रुपये हप्ता माझ्या जवळ दयावे लागतील. त्यावर मी त्यांना साहेबांनी गाडी पकडली तर कसे असे म्हटले असता श्री. वानखेडे यांनी म्हटले की, तु दिलेल्या हप्त्याचे पैसे हे मी साहेबांनाच देत असतो. त्यामुळे साहेब तुझ्या गाडयावर कोणतीही कार्यवाही करणार नाहीत. तेव्हा माझ्या जवळ पैसे नसल्याने मी त्यांना नंतर देतो असे सांगुन तिथुन निघुन आलो. त्यानंतर दिंनाक 24/12/2021 रोजी माझे टिप्पर वाहन भोकर येथे बिल्डींग मटेरीअल घेवुन आले असता श्री. वानखेडे , पोलीस यांनी माझी गाडी पकडली व माझे मोबाईलवर फोन करुन म्हटले की, तुला गाडी चालवायची असेल तर हप्ता दयावा लागेल असे सांगितले असतांना सुध्दा तु गाडी चालवत आहे. तेव्हा मी त्यांना मी सध्या बाहेर गांवी असुन नंतर पैसे देतो असे म्हटले असता त्यांनी माझी गाडी सोडुन दिली. त्यानंतर श्री. वानखेडे यांनी मला वारंवार मोबाईलवरुन फोन केला व हप्त्याचे पैसे आणण्यास सांगितले. तेव्हा मी दिंनाक 27/12/2021 रोजी भोकर येथे जावुन श्री. वानखेडे यांना भेटलो असता त्यांनी मला परत भोकर शहरात गाडया चालवायच्या असल्यास 18,000/- रुपये दर महिन्याला हप्ता दयावा लागेल असे म्हटले व हफ्त्याचे पैसे आताच पाहीजे असे म्हटल्याने मी माझे जवळ असलेले 3,000/- रुपये त्यांना दिले व उर्वरीत पैसे नंतर देतो असे सांगुन तिथुन निघुन आलो. दिंनाक 30/12/2021 रोजी माझे मोबाईल क्रंमाक 9765329198 वर श्री. वानखेडे पोलीस यांचा मोबाईल क्रंमाक 8551813333 या वरुन फोन आला व हप्त्याचे उर्वरीत पैसे घेवुन येण्यास सांगितले. तेव्हा मी त्यांना सध्या बाहेर गांवी असल्याचे सांगुन गांवा वरुन परत आल्यावर येतो असे सांगुन फोन बंद केला. तरी श्री. वानखेडे पोलीस हे ठाणेदार पोलीस स्टेशन भोकर यांचे नावाने मला माझेकडील टिप्पर भोकर शहरात व परिसरात चालविण्याकरिता दरमहा 18,000/- रुपये लाचेची मागणी करीत असुन मी त्यांना दिंनाक 27/12/2021 रोजी 3,000/- रुपये दिले असुन उर्वरीत 15,000/- रुपये त्यांना देण्याची इच्छा नसल्याने मी श्री. वानखेडे व ठाणेदार, पोलीस स्टेशन भोकर यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही व्हावी. अशा आशयाची तक्रार स्वहस्ताक्षरात दिली होती. माझ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी दोन सरकारी पंच बोलावण्यात आले होते. मला पोलीस स्टेशन भोकर जि. नांदेड येथील पोलीस श्री. वानखेडे यांची लाचेची मागणी आहे किंवा नाही या बाबतची पडताळणी कार्यवाही करण्याकरिता पंच क्रंमाक 1 म्हणुन श्री. मुगल व पंच क्र 2 म्हणुन श्री. पाचघरे हे काम



Scanned with CamSca

पाहतील असे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर श्री. राठोड यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक दाखवुन माझे व पोलीस श्री. वानखेडे यांच्यात आमच्या भेटी दरम्यान होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीनुसार माझे सांगणे प्रमाणे मी श्री. वानखेडे यांना माझे मोबाईलवरुन फोन केला असता त्यांनी मला भोकर येथील आंबेडकर चौकात येण्यास सांगितल्याने पंच क्र 1 श्री. मुगल यांचे सह माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ठेवुन पोलीस श्री. वानखेडे यांची भेट घेणे कामी आंबेडकर चौक येथे गेलो असता सदर प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये पोलीस श्री. वानखेडे यांचेशी मी माझे बिल्डींग मटेरीअल सप्लायरचे टिप्पर संदर्भात बोलणी केली. त्या दरम्यान पोलीस श्री. वानखेडे यांनी मला भोकर शहरात गाडया चालवायच्या असतील तर दरमहा दहा टायरी गाडीचे 10,000/-रुपये व सहा टायरी गाडीचे 6,000/- रुपये असे साहेबाचे 16,000/- रुपये व माझे 1,000/- रुपये हप्ता दयावा लागेल तसेच मी त्यांना यापुर्वी दिलेले 3,000/- रुपये घेतल्याचे त्यांनी कबुल केले होते. तसेच त्यावेळी श्री. वानखेडे यांनी मला बिल्डींग मटेरीअल सप्लायरचे वाहन चालविण्याकरिता साहेबांचे 13,000/-रुपये व स्वत: करिता 1,000/- रुपये असे एकुण 14,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. श्री. वानखेडे यांनी साहेबांचा वारंवार उल्लेख केल्याने मी त्यांना साहेबांची भेट करुन देण्याची विनंती केली असता श्री. वानखेडे यांनी मला साहेबांचे भेटी करिता पोलीस स्टेशन भोकर येथे घेवुन गेले व मला साहेबांचे कॅबीनचे बाहेर ठेवुन श्री. वानखेडे हे आतमध्ये गेले व थोडयाच वेळात बाहेर येवुन मला म्हणाले की, तुमच्यावर भरोसा नाही न त्याला हाकलुन दयायच, माझा कर्मचारी आहे त्याच्यावर भरोसा नाही न त्याला ठाण्यात नाही आणायच , त्याला भरोसा असेल तर करल असे साहेबांनी म्हटल्याचे सांगुन भेटण्यास नकार दिल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. वानखेडे यांनी मला 14,000/-रुपये लगेच आणण्यास सांगितल्याने श्री. वानखेडे यांचे विरुध्द सापळा कारवाई आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते. त्यानंतर श्री. वानखेडे यांना मी लाच रक्कम म्हणुन देण्याकरिता सोबत आणलेले माझे जवळील 500/- रुपये दराच्या 28 नोटा एकुण 14,000/- रु हजर केले. सदर नोटाचे क्रमाक एका कागदावर लिहीण्यात आल्यावर नापोकाँ कुंजाम यांनी मला व पंचाना अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प याचे गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षिक दाखविले व नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. तसेच श्री. वानखेडे यांनी लाच स्वीकारल्यानंतर गळ्यातील पांढरा दुपट्टा गळयातुन काढुन हातात घ्यायचा असा इशारा करुन लाच स्विकारल्याची खात्री करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आलेले लाचेची रक्कम 14,000/- रु माझे शर्टचे खिशात ठेवण्यात आली व व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन रेकॉर्डर सुरु करुन दो-याचे साहयाने माझे कमरेला बांधण्यात आले. त्यानंतर मला पंच क्र 1 श्री. मुगल यांचे सह दुपारी मोटार सायकलने आंबेडकर चौक , भोकर येथे रवाना केले. आमचे मागे मागे सापळा पथक , पंच क्र 2 सह खाजगी वाहनाने आंबेडकर चौक , भोकर येथे आले व सापळा लावण्यात आला. मी पंचा सह आंबेडकर चौक , भोकर येथे पोहचल्यावर श्री. वानखेडे यांना माझे मोबाईलवरुन फोन केला असता त्यांनी मला तिथेच थांबण्यास सांगुन लगेच येतो असे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने श्री. वानखेडे हे मी थांबवुन असलेल्या ठिकाणी पायी चालत आले. तेव्हा त्यांनी येथे गर्दी असल्याने चला तिकडे असे म्हणुन ते त्यांचे मोटार सायकलने व मी माझे मोटार सायकलने त्यांचे मागे मागे नांदेड रोडवरुन तामसा रोड वरील धानोरा गांवाकडे जाणा-या रोडवर थांबुन श्री. वानखेडे यांनी साहेबांनी पैसे घेवु नका व गाडया पण चालवायच्या नाही असे म्हणुन लाच न स्विकारता तिथुन निघुन गेले. मी दिलेल्या तक्रारी नुसार केलेल्या कारवाई प्रमाणे दिनाक 05/01/2022 रोजी दुपारी 01.15 वाजता ते 02.15 वाजता दरम्यान माझे पोलीस स्टेशन , भोकर येथील पोलीस श्री. वानखेडे यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये पोलीस श्री. वानखेडे यांनी मला माझे बिल्डींग मटेरिअल सप्लायरचे दोन टिप्पर वाहन चालविण्या करिता 3,000/-रुपये घेतल्याचे कबुल करुन उर्वरीत 13,000/- रुपये साहेबांचे व 1,000/- रुपये स्वतसाठी लाचेची मागणी केली आहे. तसेच दिनाक 05/01/2022 रोजीचे सापळा कार्यवाही दरम्यान श्री. वानखेडे यांनी मला मागणी केलेली लाच रक्कम स्विकारली नाही. ते आता माझ्याजवळुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची मला पक्की खात्री झाली आहे. तरी मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे पोलीस स्टेशन भोकर जि. नांदेड येथील पोलीस श्री. वानखेडे यांनी दि. 05/01/2022 रोजीच्या पडताळणी दरम्यान मला माझे बिल्डींग मटेरिअल सप्लायरचे दोन टिप्पर वाहन चालविण्याकरिता 3,000/- रुपये घेतल्याचे कबुल करुन उर्वरीत 13,000/- रुपये साहेबांचे व 1,000/- रुपये स्वत:साठी लाचेची मागणी केल्याने श्री . रघुनाथ दिगंबर वानखेडे पोलीस हवालदार, ब. न. 1767 नेमणुक पोलीस स्टेशन भोकर जि.नांदेड रा. प्लॉट नंबर 17 राजसारथी नगर , तरोडा बु, जि. नांदेड यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्या करिता मी फिर्याद देत आहे. मी तोंडी सांगितल्या प्रमाणे माझी फिर्याद संगणकावर टाईप करण्यात आली असुन प्रिंट काढल्यावर मला वाचुन दाखविली असता बरोबर आहे. समक्ष सही फिर्यादीचा--sd----sd--(संतोष इंगळे)पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** VIKAS SHEKUJI PATIL(I (Inspector)) / POBN62686 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Reeky.

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Reeky.

दिगांबर पांडुरंग पाटील
पोलीस उपनिरीक्षक
पो.स्टे.भोकर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VIKAS SHEKUJI PATIL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN62686



Scanned with CamSca